# बृहन्मुंबई महानगरपालिका

(सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग)
क्र सआएच/पूर्व/**०२३८१२**/ स.अ (परी.) दि.**०३.०१.२५**

## <u>स्वारस्य अभिव्यक्ती</u>

एच/पूर्व विभागातील प्रभाग क्र.९१ मधील सिद्धार्थ नगर, वाकोला पाईपलाईन रोड, श्री.कृष्ण नगर रोड, व र. के. रोड,सांताक्रुझ ( पूर्व ) येथील अत्यावश्यक सुधारणा करण्याबाबत या कामाकरीता म.न.पा. अधिकृत कंत्राटदार यांच्याकडून अर्ज मागवित आहे.

म.न.पा. अधिकृत कंत्राटदार यांनी या बाबतचा तपशील, अर्ज एच/पुर्व विभाग कार्यालयातील मुख्य लिपिक (व्यय) 'एच/पुर्व' विभाग यांच्याकडे संपर्क साधावा. सर्व अर्जदारांकडून अर्जाचा नमुना हा रु. ३२०/- + १८% टक्के GST कर व इसारा अनामत रक्कम रू. ६०००/- यशस्वी कंत्राटदाराकडून स्वतंत्रपणे भरून घेण्यात येईल.

म.न.पा. अधिकृत कंत्राटदारांचे अर्ज जमा करण्याची मुदत ही दि. ०८.०१.२०२५ रोजी दुपारी ०३ वाजेपर्यंत आहे. अर्ज जमा करताना सोबत म.न.पा. अधिकृत कंत्राटदारांचे मुळ कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे. अर्धवट तसेच चुकीचे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. तसेच अर्ज सादर करण्याच्या अंतिम वेळेनंतर म्हणजेच दि ०८. ०१.२०२५ रोजी दुपारी ०४.०० नंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

तसेच सदरची सोडत ही दिनांक ०८. ०१.२०२५ रोजी दुपारी ०५.०० नंतर सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग यांच्या दालनात घेण्यात येईल. तसेच सदर कामाकरीता एक स्वतंत्र म.न.पा. अधिकृत कंत्राटदार प्रतिक्षा यादीमध्ये घेण्यात येतील.

सदर सोडती करिता सर्व पात्र म.न.पा अधिकृत कंत्राटदार उपस्थित राहणे अनिवार्य आहे. याची कृपया नोंद घ्यावी. कोणत्याही म.न.पा. अधिकृत कंत्राटदाराचे एक पेक्षा जास्त पदाधिकारी यांना सहाय्यक अभियंता(परि.) एच/पूर्व विभाग यांच्या दालनात प्रवेश देण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**स्वारस्य अभिव्यक्ती** स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. सहाय्यक आयुक्त ' एच/पूर्व' विभाग यांनी राखुन ठेवलेला आहे. अट असलेली **स्वारस्य अभिव्यक्ती** स्विकारली जाणार नाही.

**सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग**